Impact Factor
5.307 (SJIF)

RESEARCH HUB
International Peer-Reviewed Multidisciplinary E-Journal

ISSN
2582-9173

# नामदेव कांबळे यांचे लौकिक जीवन

**पद्मा विश्वनाथ नागदेवे**
मराठी विभाग
एल.ए.डी. कॉलेज, शंकरनगर नागपूर
Email Id - padmanagdeve358@gmail.com

---

**प्रास्ताविक -**

नामदेव कांबळे हे प्रसिद्ध कादंबरीकार म्हणून सर्वांच्या ओळखीचे आहेत. त्यांनी आपल्या साहित्यलेखाने मराठी कादंबरी वाङ्मयामध्ये स्वतंत्र जागा तयार केली आहे. नामदेव कांबळे यांनी कथालेखन, काव्यलेखन, कादंबरीलेखन, ललितगद्यलेखन अशा अनेक वाङ्मय प्रकारामध्ये लेखन केले आहे, पण असे असले तरी त्यांची कादंबरीकार म्हणून विशेष ओळख आहे. त्यांनी आजपर्यंत 'अकल्पित' (कविता संग्रह), 'आपले दादा - दादासाहेब हावरे' (चरित्र), 'गहिवर' (कवितासंग्रह), 'गांधी उद्यासाठी' (वैचारिक), 'तो : ती : अन्वयार्थ' (कवितासंग्रह), 'परतीबंद' (कथासंग्रह), 'प्रत्यय' (कविता संग्रह), 'महात्मा गांधी आणि डॉ. आंबेडकर : संघर्ष आणि सन्मवय' (वैचारिक), 'शब्दांच्या गावा जावे' (भाषणे), 'समरसता साहित्य स्वरुप व समिक्षा' (समिक्षा), 'सिद्धार्थ' (ललित लेख), 'स्मरण विस्मरण' (लेख संग्रह) या सारखे अनेक साहित्य प्रकारात यांनी लेखन केले आहे.

नामदेव कांबळे यांनी आपल्या साहित्यनिर्मितीच्या माध्यमातून समाजातील मागासवर्गीय समाजात घडत असलेल्या कुप्रथा, चालीरीति, परंपरा, त्यांचे प्रश्न, महार मांगांच्या स्त्रियांचे प्रश्न, नवकवींची होत असलेली घुसमट, जातीभेद, लैगिंग संबंध, पौराणिक कथा तसेच त्यांच्या कांदबऱ्यातील अभिनव विचारसरणी अशा समाज जिवनातील विविध घटकांना केंद्रवर्ती ठेवून साहित्यनिर्मिती केलेली आहे. त्यांनी लिखाण केलेल्या अनेक साहित्यरचनेच्या माध्यमातून यांची ओळख होते. नामदेव कांबळे यांनी जे वैविध्यपूर्ण लेखन केले आहे, त्याचा परामर्श घेण्यापूर्वी त्यांच्या जीवनचरित्राची माहिती करुन घेणे आवश्यक आहे. एका लेखकाच्या वाङ्मयाचा अभ्यास करताना त्यांच्या जीवनाची व्यवस्थितपणे ओळख करुन घेणे गरजेचे ठरते, कारण त्यांचे जीवन आणि त्यांचे साहित्य यांचा घनिष्ठ संबंध असतो. या दृष्टीने नामदेव कांबळे यांच्या साहित्याचे परिपूर्ण आकलन होण्यासाठी त्यांच्या जीवनचरित्राची माहिती करुन घेणे उपयुक्त ठरते. या प्रकरणात त्यादृष्टीने नामदेव कांबळे यांच्या लौकिक जीवनाचा मागोवा घेतला आहे.

गावाबाहेर जीवन जगणाऱ्या समाजाला स्वतःची ओळख नव्हती. रुढी परंपरेने होणारा त्रास, समाजाकडून होणारे शोषण, अमानुषतेची वागणूक, शारीरिक शोषण बरोबर विशिष्ट जातीचे होणारे हृदयद्रावक शोषण अतिशय भितीदायक आहे. ही जात फक्त गावकुसाबाहेरचीच नाही तर गावकुसाच्या आत राहणारी जात देखील होती. रक्तपिपासू रक्त पिण्यासाठी जातीची आवश्यकता नाही तर केवळ रक्ताची आवश्यकता असते. समाजात जगतांना शोषितांचा जीवन देण्याकऱ्यांवर अवलंबून असते. त्यासाठी म्हणेल ती किंमत, स्वतःचा स्वाभिमान मारुन, नैतिकतेचा विचार न करता सतत मन मारुन सर्व काही करावे लागते. जीवन जगत असतांना संसाराच्या या रहाटात जीवनाचा गाडा फरफटत न्यावा लागत असे.

कार्ल मार्क्सचा लढा कामगाराच्या शारीरिक शोषणाविरुद्ध होता. इथे तो लढा संपूर्ण जगातील कामगाराच्या स्वातंत्र्यासाठी होता. शोषणाचे शासनकर्ते व या शासनकर्त्यांच्या आश्रयाने जे उभे राहून शासनाचा

जयघोष करीत स्वतःला मानवतेचे देव बणणाऱ्यांवर अत्याचारी, दृष्टवृत्ती, राक्षसवृत्तीच्या माणसाविरुद्ध होतो. ज्यांचे शोषण होते त्यात शेतकरी, शेतमजूर, गावात राहणाऱ्या गावकुटुंबाचे कल्याण हे कार्ल मार्क्सच्या आर्थिक चळवळीच्या पाठीमागचा उद्देश होता. त्यांच्या तत्वज्ञानाचा चळवळीचा केंदबिंदू हा माणूस होता. मूलभूत सामान्य माणसाच्या प्रश्नांना धरुन डॉ. बाबासाहेबांच्या ज्या काही चळवळी झाल्यात त्यात मजूरांच्या हक्कांचाही प्रश्न होता. एका साहित्यिकांचा अभ्यास करत असताना तो अभ्यासविषय झालेल्या साहित्यिकाला केंद्रस्थानी ठेवून अभ्यास करावा लागतो. तो साहित्यिक ज्या समाजात वावरतो, वाढतो, तो समाज त्यांच्या काळातील परिस्थिती, त्याच्या भोवती असलेले साहित्यिक वातावरण, त्या साहित्यिकांचे कौटुंबिक जीवन या सर्वातून त्या लेखकाचे व्यक्तिमत्व घडत असते. लेखकाचे जीवन आणि त्याचे साहित्य, लेखकाचे व्यक्तिमत्व आणि साहित्य यांचा जवळचा संबंध असतो. सर्जनशिल लेखकाने केलेले ललित साहित्यलेखन हे एका परीने त्याच्या आत्मचरित्रासारखेच असते. या अर्थाने एका लेखकाच्या समग्र साहित्याचा अभ्यास करताना त्या लेखकाच्या जीवनाची माहिती करुन घेणे अभ्यासाला साहाय्यक ठरते. पण अशी माहिती करुन घेणे म्हणजे त्याच्या जीवनचरित्राचा सखोल अभ्यास करणे नव्हे. याविषयी बाळकृष्ण कवठेकर म्हणतात 'लेखकाचे बालपण, त्याचे कुटुंब व कौटुंबिक जीवन, त्याच्या नंतरच्या जीवनाची वाटचाल, त्यातील लक्षणीय घटना-प्रसंग याची माहिती करुन घणे त्याच्या वाङ्मयातील अनेक बाबींचे आकलन होण्याच्या दृष्टीने उपयुक्त ठरते. जीवनाच्या वाटचालीत येणाऱ्या अनेक प्रकारच्या अनुभवांतून लेखक या व्यक्तिचे व्यक्तिमत्व आकाराला येत असते. त्याच्या उमलत्या वयात तो ज्या व्यक्तिंच्या सहवासात येतो त्यांचाही त्याच्यावर काही एक परिणाम होत असतो. आई, वडील, भाऊ, शिक्षक, एखादा प्रभावी लोकनेता यांचे संस्कार लेखक या मनावर होत असतात. त्याची उपजतम मनः प्रवृत्ती आणि या सर्वांचा त्याच्यावर होणारा परिणाम यातून लेखक या व्यक्तिचे व्यक्मित्व आकाराला येते. या साऱ्यांचाच त्याच्या साहित्याचे स्वरुप ठरवण्यामध्ये मोठा वाटा असतो. म्हणून हे सारे पुरेशा समजुन जाणून घेणे त्याच्या वाङ्मयाच्या अभ्यासाच्या दृष्टीने मोठया प्रमाणात साहाय्यक ठरु शकते.'[१]

नामदेव कांबळे यांच्या साहित्यात अस्सल ग्रामीण भाषेत ग्रामस्थानचे सुख-दुःख, त्यांना भोगावा लागणारा त्रास त्यांच्या वेदना, अपमान हे सगळे त्यांनी अनुभवले होते. तेच अनुभव त्यांनी जसेच्या तसेच आपल्या शब्दात चितारले आहे. मातंग समाजाचा पदोपदी होणारा अपमान, त्यांचा छळ, त्यांचा होणारा शोषण अतिशय प्रामाणिकपणे त्यांनी जे उतरवले ते मनाला जाउन भिडणारे आहे.

समाजात मातंग समाजाला शिक्षणाची कोणतीच मुभा नव्हती. अशा समाजात त्यांचा जन्म झाला. गरीब परिस्थिती असतांना भाकर मिळविण्यासाठी खूप हालअपेष्टा सहन करावी लागली. ही जात हत्तीचा बळ असलेली शक्तिशाली जात आहे. यांच्या जीवनात सदोदीत संघर्ष आहे. गावकुसाबाहेरच्या जीवनात महारांच्या जीवनापेक्षा मागांचे जीवन जास्त हलाकीचे होते. लेखकांनी आपल्या साहित्यात मांगाचे दुःख, दारिद्र्य, भूक, निराशा, स्त्रीची झालेली विटंबना, संभोग व त्यातील भयानकता चित्रित केलेली आहे.

नामदेव कांबळे यांच्या साहित्यमागची प्रेरणा सामान्य माणसाच्या जीवन जगव्यापाची प्रेरणा आहे. सामान्य माणसाचे दुःख, संघर्ष हे सगळे लेखक भोगत आलेले होता. सर्वसामान्य माणसाला आलेला जीवनाचा अनुभव हिच त्यांच्या साहित्याची प्रेरणा आहे. हेच अनुभव साहित्याच्या रुपामध्ये आपण सामाजाला परत करीत असतो. समाज हा कोणताही वर्गातला असो त्यांच्या जीवनात आलेले सुख-दुख, संघर्ष,यातना यामधूनच समाजमनातील साहित्यलेखनास उधान येत असते आणि सगळे एक साहित्यिकच करु शकतो. आकाशाला गवसणी घालण्याची

क्षमता एका उत्कृष्ट साहित्यीकामध्येच असते. शब्दातून सारे व्यक्त करतांना त्यांची अनुभव विश्वाला गवसणी घालायला लागते.

या दृष्टीने लेखकाच्या व्यक्तिमत्वाचा अभ्यास हा त्यांच्या साहित्यकृतीचा अभ्यासास पूरकच ठरत असतो. कधी या अभ्यासातून लेखकाचे साहित्यकृतीशी असलेले साहचर्याचे संबंध दिसून येतील. तर कधी तटस्थतेचे, विरोधाचे संबंध असण्याची शक्यता असते. हा प्रकार फार वेगळाच असण्याची शक्यता असते. गो.वि. करंदीकर यांना लेखकाच्या चरित्राबरोबरच त्यांच्या वाङ्मयीन व्यक्तिमत्वाचाही विचार करणे आवश्यक वाटते. याविषयी करंदीकर म्हणतात, 'आपल्या निरनिराळया जीवनोपयोगी व्यवहारांमध्ये संगती साधताना त्याला ज्या व्यक्तिमत्वाचा उपयोग होतो, ते लौकिक व्यक्तिमत्व होय, आर्थिक, सामाजिक, राजकीय व नैतिक अशा निरनिराळया प्रेरणांचे कालसापेक्ष परस्परावलंबित्व व्यक्तिमत्वात गृहीत असते, तरीही लौकिक व्यक्तिमत्वाचे लक्ष्य चरित्र हे असल्यामुळे त्यांची प्रकृती स्थिर राहण्याकडे व आपले सर्व अंतर्विरोध नष्ट करण्याकडे असते. उलट वाङ्मयीन व्यक्तिमत्वाचे लक्ष्य चरित्रातील होण्याचे असल्याने त्याला या अंतविरोधाची भीती वाटत नाही नव्हे ते त्याला हवे असतात. व्यक्तित्वाच्या पार्थिव मुशीतूनच हे नवे व्यक्तित्व निर्माण होत असले, तरी त्या दोहोंमधील संबंधांचे स्वरुप लेखकाच्या पिंडधर्माप्रमाणे बदलत असते.' [२]

गो. वि. करंदीकर व बाळकृष्ण कवठेकर यांच्या वरील निर्दिष्ट केलेले मताचा मथितार्थ ध्यानात घेतल्यास चरित्रात्मक समीक्षापध्दतील पडणाऱ्या मर्यादांचे भान ठेवून एका लेखकाचा अभ्यास करताना, त्या लेखकाच्या लौकिक व वाङ्मयीन व्यक्तित्वाचा विचार करणे आवश्यक ठरते.

प्रस्तुत प्रकरणात त्या दृष्टीने नामदेव कांबळे यांच्या जीवनरेखेचा थोडक्यात परामर्श घेउन त्यांचे बालपणातील जीवन, विद्यार्थीजीवन, तारुण्यकालीण भावविश्व, लौकिक जीवनातील समस्या, व्यावसायिक जीवन, लौकिक जीवनाची वाटचाल इत्यादी महत्वाच्या बाबींचा समावेश या लेखात केलेला आहे. त्या आधारे नामदेव कांबळे यांच्या व्यक्तिमत्वाची वैशिष्टये लक्षात घेउन, त्या वैशिष्टयांचा त्यांच्या साहित्य निर्मितीचा कसा आणि कोणता संबंध आहे याचाही विचार केला आहे.

**कौटुंबिक पार्श्वभूमी, जन्म व बालपणातील जीवन -**

नामदेव चंद्रभान कांबळे यांचा जन्म अकोला जिल्हयातील मालेगाव तालुक्यात शिरपूर (जैन) येथे १ जानेवारी १९४८ रोजी एका मातंग कुटुंबात झाला. यांचे आई-वडील मोलमजूरी करुन आपल्या संसाराचा गाडा चालवायचे. परिस्थितीशी झगडत दोन हात करीत लेखकाचे बालपण गेले. यांचा परिवार मोठा होता. चार भाऊ व तीन बहिणी आणि आई-वडील. त्यांचे कुटुंबातील सर्वात मोठी बहिण वत्सला, मोठा भाऊ पुंडलीक, त्याच्या पाठीवर समींद्रा व मनकर्णा हया दोन बहिणी, त्याच्या पाठीवर नामदेव नंतर पांडुरंग आणि धाकटा विठ्ठल असे घरात नऊ जण होते. पराकोटीचे दैन्य त्याकाळामध्ये असूनही आई-वडीलांनी मुलांना शिक्षण दिले.

लोकांच्या शेतावर जाऊन मोलमजुरी करणे, शिंदीच्या केरसुण्या तयार करणे, टोपल्या विणणे, डाली कणगी करणे, ग्रहण – अमावस्या मागणे, लग्नात व बारस्यात वाद्य वाजवणे इत्यादी पारंपारिक उद्योग करायचे. त्या काळात स्त्रीला मजुरी म्हणून दिवसभराची चार आणि पुरुषाला आठ आणे मिळायची. एवढया पैश्यामध्ये दोन वेळच्या जेवनाची सोय होत नव्हती. त्यामुळे लेखकाच्या कुटुंबाला कधी अर्धपोटी तर कधी उपाशी राहावे लागे.

**विद्यार्थी जीवन :-**


Research Hub International Journal

लेखकाचे प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षण शिरपूर येथे झाले. गरीबीला न जुमानता लेखकांच्या आईवडिलांनी लेखकाला व त्याच्या दोन्ही भावंडांना शाळेत टाकले. पांडुरंग शिकला नाही. लेखक व विठ्ठल मात्र नियमित शाळेत जात राहिले. लेखक चैथीमधून पास होवून पाचवीत गेले तेव्हा धाकटा विठ्ठल पहिलीत होता. मोठा भाऊ आठवा वर्ग शिकला होता. नंतर त्याचेही लग्न झाले.

लेखक एस.एस.सी. ला गेले त्या वर्षी त्यांच्या वहिनीला नर्सची नोकरी लागली. ७७ टक्के नी एस.एस.सी. पास होउन ते शाळेतून पहिले येतात. त्यामुळे शिक्षक व आजुबाजूचे नातेवाईक त्यांना डॉंक्टर बनण्यास सांगू लागले त्याच्या भावाला व वहिणीला तेच वाटु लागले की लेखकांनी डॉंक्टर व्हावे. त्यामुळे त्यांच्या मार्गदर्शनाने नागपूरच्या पूर्वीच्या गव्हरमेंट सायन्स कॉंलेज व आताच्या विज्ञान संस्थेत १९६७ मध्ये प्रियुनिव्हरसिटीला प्रवेश घेतला. त्याचबरोबर बी.एस्सी. पार्ट वन केले. १९७७ मध्ये बी.ए. तर १९७८ मध्ये बी. एड. झाले.

तारुण्यकाळातील भावविश्व

तारुण्याच्या काळामध्ये लेखकाला गरीब परिस्थितीमुळे शिक्षणासाठी खुप हालअपेष्टा सहन कराव्या लागल्या. एम.बी.बी.एस. शिक्षणासाठी त्यांना भाड्याच्या खोलीत राहावे लागे. खोलीभाडे देणे सोपे व्हावे म्हणून एका खोलीत दोघे राहू लागले. एवढे सगळे होवूनही मेससाठी पैसे कमी पडू लागले तेव्हा खोलीतच स्वंयपाक करायचा असा सल्ला भावाने दिला. तरीही पैसे कमी पडायचे. त्यासाठी मित्राकडून उधार घ्यावे लागे. कॉंलेजात रॅगिंग पध्दत खुप चालायची, सिनीयर्स खोलीवर नेउन रॅगिंग करायचे. त्यामुळे लेखकाचे अभ्यासात लक्ष लागत नव्हते. कमी वयात कर्तव्याची जबाबदारी त्यांच्यावर आलेली होती. गरीब परिस्थितीमुळे इच्छा आकांक्षा मागे ठेवून शिक्षण घेण्याचा प्रयत्न लेखकांनी केला. लेखकाचे भाऊ आणि वहिणी यांना लेखकांचे शिक्षणाचे खर्च झेपत नव्हते म्हणून त्यांना कॉंलेज सोडून देण्यास सांगितले. त्यांना काय करावे सुचेना. परंतु समाज कल्याण वसतिगृह निवड समितीचे भानुदास कांबळे मदतीला धावून आले. त्याच्यामुळे चोखामेळा वसतिगृहात त्यांचा नंबर लागला. लेखकाच्या पोटाची चिंता मिटली. कॉंलेजला येण्याजाण्याचा प्रश्न मात्र होता. तेव्हा एक मित्र मदतीला धावून आला. त्याने आपली सायकल लेखकाला दिली व स्वतःसाठी दुसरी सायकल घेतली. दिवस रात्र अभ्यासकरुणही लेखक नापास झाले. त्यानंतर त्यांना वसतिगृह सोडून शिरपूरला यावे लागले. मिळेल ते काम करुन, मोलमजूरी करु लागले. तारुण्यकाळामध्ये लेखकाचे जीवन जसा मार्ग मिळेल तसा चाललेला होता. शिक्षणासाठी त्यांची होत असलेली फरफट आणि कमी वयात येणारी जबाबदारी यामुळे त्यांचा तारुण्याचा काळ हा दुःखातच गेला. पण या काळातही त्यांचे लिखाण चालूच होते.

**लौकिक जीवनातील समस्या :-**

मातंग समाजात जन्माला आलेले नामदेव चंद्रभान कांबळे यांची कौटुंबिक परिस्थिती खूपच बिकट होती. मोठे कुटुंब आणि त्यातल्या त्यात तेराव्याला पुजलेली गरीबी यामुळे संसाराचा गाडा चालवतांना त्रास व्हायचा. आई-वडिल दुसऱ्यांच्या शेतावर मजूरी करायचे. मिळेल ते काम करुन कस तरी दोन वेळच अन्नही मिळत नव्हते. लेखक अभ्यासात हुशार होते. त्यांनी डाॅक्टर व्हावा अशी सगळयांची ईच्छा होती. त्या तयारीलाही लेखक लागले. पण शिक्षण घेत असतांना राहण्याची व्यवस्था, खाण्याची व्यवस्था हया सगळयांसाठी पैशाची सोय अपूरी होत होती. शिक्षणासाठी एवढया हालअपेष्टा सहन करुनही यश आले नाही. म्हणून लेखक शिरपूरला आले. वाट्टेल ते काम करुन दिवस काढू लागले. ऐवढा करुनही भूक काही शांत होत नाही. म्हणून कामाच्या शोधात त्यांनी अकोला गाठला. खदान भागात ते राहायला लागले. येथे त्यांना पराडकरांच्या दवाखान्यात कंपांउडरची नोकरी

मिळाली. त्यानंतर वाशिमच्या राणी लक्ष्मीबाई कन्याशाळेत वा ॅचमन म्हणून नोकरीला लागले. १९७७ मध्ये ते बी.ए. झाले. त्याच शाळेत प्रयोगशाळा सहाय्यक म्हणून काम पाहू लागले. १९७८ मध्ये ते बी. एड. झाले आणि त्यानंतर त्याच शाळेत निवृत्र होईपर्यंत शिक्षक म्हणून नोकरी करु लागले.

**व्यावसायिक जीवन :-**

नामदेव चंद्रभान कांबळे शिक्षक म्हणूनच शेवटपर्यंत जीवन व्यतीत केले. पण त्याचबरोबर एक उत्तम दर्जेदार लेखक म्हणूनही त्यांनी लेखन केले. काव्यलेखन, कादंबरीलेखन, ललीतलेखन इत्यादी वाड्मय प्रकारात लेखन केले आहे. 'राघववेळ' या कादंबरीपासून लेखकाला प्रसिद्धी मिळाली. वाशिमच्या राणी लक्ष्मीबाई कन्याशाळेत 1978 मध्ये शिक्षक म्हणून लागले.

**लौकिक जीवनाची वाटचाल :-**

विदर्भातील वाशिमच्या चपराशीपुऱ्यात राहणाऱ्या कांबळे यांच्या झोपडीला कुडाच्या भिंती होत्या. वीज, नळ जोडणी नव्हती. येथेच त्यांना अकादमी पुरस्कार मिळाला. वाशिम येथील प्रसिद्ध साहित्यिक, कवी, ना. च. कांबळे या नावाने ओळखले जाणारे नामदेव चंद्रभान कांबळे यांना प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला सन्मानाचा पद्मश्री पुरस्कार (साहित्य) जाहीर झाला.

नामदेव चंद्रभान कांबळेचीं मूल्यविषयक निष्ठा त्यांच्या लेखनामधून व्यक्त होते. माणसाने स्वतःचा आदर करावा. त्यांच्याहून अधिक इतरांचा आदर करायला हवा असे कांबळे यांचे मत आहे. नामदेव चंद्रभान कांबळे यांच्या श्रद्धावान मनाचा प्रत्यय त्यांच्या लेखनातून येतो. त्याच्या लेखनामधून अतिथी बद्दलचा आदर व्यक्त होतो. आताच्या भारतीय संस्कृतीत मात्र अतिथी बदलचा आदर कमी होत चाललेला आहे. असे ते आपल्या लेखनात मांडतात. आई-वडिलांचे ऋण प्रत्येक मुलाने मानले पाहिजेत. त्याच्या म्हातारपणाची काठी होवून, त्यांना आधार द्यायला पाहिजे. त्यांच्याप्रती असलेला प्रेमभाव लक्षात घेवून आपले कर्तव्य जबाबदाऱ्या पार पाडायला पाहिजेत. हे मत ते आपल्या लेखनातून व्यक्त करतात. पती पत्नीच्या नात्यातील खोलवरपणा ते आपल्यासमोर व्यक्त करतात. जीवन जगत असतांना अनेक उतार चढावातून लेखकाची भावनाशील वृत्तीचा प्रत्यय त्याच्या अनुभवातून साहित्यात चितारलेली दिसते. समाजातील उपेक्षित दुर्बल, दारिद्रयात जगणाऱ्यांबद्दल त्यांच्या मनात दया दिसते. दारिद्रयात जीवन जगलेले असल्यामुळे ही भावनाशीलता त्यांच्या साहित्यात दिसून येते.

ललित लेखनामधून लेखकाच्या समाजशिल वृत्तीचे प्रत्यय येतो. समाजातील गरीब, शोषित, दुबळया, उपेक्षितांच्या मदतीला धावून जाणे हे एक माणूस म्हणून आपले कर्तव्य आहे ही भावना त्यामागे असलेली दिसते. नामदेव चंद्रभान कांबळे यांना निसर्गावर खूप प्रेम आहे. ते स्वतः निसर्गाच्या सान्निध्यात ग्रामीण भागात जन्माला आले. मानव स्वतःच्या सुखासाठी निसर्गाला किती त्रास देतो आहे याबद्दल आपल्या लेखांमधून ते व्यक्त करतात. लेखकाच्या बुद्धिवादी दृष्टिकोनाचाही अनेक ठिकाणी प्रत्यय येतो. अनेक जागी अनुभवावर आधारित लेखकाचे विचार व्यक्त होतात. अहिंसा, खुर्ची, लोकशाहितील लोकनिष्ठा या लेखामध्ये लेखकाचे आजच्या परिस्थितीविषयी व्यक्त होणारे विचार खूप मूल्ययुक्त आहेत. वर्तमान परिस्थिती बदलण्याचा आशावादी दृष्टीकोन त्यांच्या ललित लेखनातून ठिकठिकाणी व्यक्त होतो. लेखकाच्या कवी हृदयाचा प्रत्यय त्यांच्या लेखाच्या माध्यमातून येतो. त्यांच्या लेखनामागची भूमिका ही मानवतावादी आसल्याचे दिसून येते.

**निष्कर्ष :-**

1. एका साहित्यिकांचा अभ्यास करत असताना तो अभ्यासविषय झालेल्या साहित्यिकाला केंद्रस्थानी ठेवून अभ्यास करावा लागतो.
2. लेखकाच्या व्यक्तिमत्वाचा अभ्यास हा त्यांच्या साहित्यकृतीचा अभ्यासास पूरक ठरत असतो.
3. जीवन जगत असतांना अनेक उतार चढावातून लेखकाची भावनाशील वृत्तीचा प्रत्यय त्याच्या अनुभवातून साहित्यात चितारलेली दिसते.
4. लेखकाच्या कवी हृदयाचा प्रत्यय त्यांच्या लेखाच्या माध्यमातून येतो. त्यांच्या लेखनामागची भूमिका ही मानवतावादी असल्याचे दिसून येते.

**संदर्भ ग्रंथ :-**


- कवठेकर बाळकृष्ण, 'एका लेखकाचा अभ्यास', प्रतिष्ठान संपादक-लक्ष्मीकांत तांबोळी, वर्ष 30 , अंक चौथा, मार्च-एप्रिल 2003, पृ. 3,4.
- करंदीकर गो.वि., 'परंपरा आणि नवता' पृ. 136).


Research Hub International Journal